# अपंग अनुशेष भरती

## जाहिरात क्रमांक 01/2013

## जिल्हा निवड समिती उस्मानाबाद

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ मुंबई यांचेकडील दाखल जनहित याचिका क्रमांक 3294/2010 प्रकणात अपंगाचा अनुशेष विशेष मोहिमेद्वारे भरणेबाबत निर्देश दिलेले असलेने विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांचे अ.शा.पत्र क्र. 2011/विशा/जिप/आस्था-1/सीआर-87/कावि दिनांक 19.10.2011 तसेच दि.3.3.2013 रोजी मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे अध्यक्षतेखालील आयोजित व्हिडीओ कॉन्फरन्स बैठकीतील सुचना नुसार अपंग अनुशेषांतर्गत सरळसेवेची खालील रिक्त पदे भरणेबाबत दिलेल्या निर्देशाप्रमाणे जिल्हा परिषद उस्मानाबाद व त्यांच्या अधिपत्याखालील विभागाच्या आस्थापनेवरील खालील नमूद गट क या संवर्गातील अपंगाच्या अनुशेषाची पदे भरण्याचे अनुषगाने निवड यादी तयार कऱण्यासाठी शैक्षणिक अर्हतेनुसार पात्र उमेदवारांकडून स्पर्धा परीक्षेसाठी (लेखी / मौखीक ) शासन परिपत्रक क्रमांक एपिटी- 2009/ प्र.क्र. 352/ आस्थापना-8 दिनांक 17 डिसेंबर, 2009 मधील तरतुदीनुसार **दिनांक- 28 मार्च 2013** पर्यंत (सुटीचे दिवस वगळून) अर्ज मागविण्यात येत आहेत सदर जाहिरात अर्जाच्या नमुन्यासह http://osmanabad.nic.in या संकेतस्थळावर (Web site) वर उपलब्ध आहे.

**अपंगाच्या अनुशेषांतर्गत भरावयाच्या रिक्त पदांचे आरक्षण ( समांतर आरक्षणासह)**

| अ.क्र. | पदनाम | एकूण भरावयाची पदे | अपंगत्वाचा प्रकार |
|---|---|---|---|
| 1 | आरोग्य सेवक (महिला) | 5 | चलनवलन विषयक विकलांगता [अस्थिव्यंग (**OL**)] |
| 2 | पशुधन पर्यवेक्षक | 2 | श्रवण शक्तीतील दोष [कर्णबधीर (**HH**)] |
| 3 | स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक | 1 | चलनवलन विषयक विकलांगता/ श्रवण शक्तीतील दोष [अस्थिव्यंग- **OL,OA** कर्णबधीर-**HH**)] |
| | **एकुण** | **8 पदे** | |

**टीप** :- 1) वरील सर्व संवर्गातील पदे ही अपंगासाठी राखीव दर्शविण्यात आलेली आहेत. सदरील अपंगाची पदे भरताना शासन निर्णय दि. 19 मार्च 2010 नुसार ज्या जातीच्या प्रवर्गातील अपंग उमेदवार उपलब्ध होतील त्या जातीच्या प्रवर्गात समाविष्ठ करण्यात येईल. सदर राखीव असलेल्या पदाकरीता जाहिरातीत नमुद केलेल्या पदासमोरील अपंगत्वाच्या प्रकारातील अपंग उमेदवार अर्ज सादर करू शकतील. याबाबत सदरील उमेदवाराने अर्जासोबत सक्षम प्राधिकाऱ्याचे किमान 40 टक्के अपंगत्व असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक- न्यायाप्र-2011/प्र.क्र.11/सुधार-3 दिनांक 17 ऑगस्ट, 2011 मधील तरतूदीप्रमाणे अपंग उमेदवाराला परिक्षेसाठी लेखनिक हा परिक्षा घेणा-या प्राधिका-याने पुरवावा अथवा उमेदवाराने त्यांची इच्छा असल्यास स्वत: लेखनिकाची व्यवस्था करावी अशा सुचना असल्याने उमेदवाराने याबाबतचा स्पष्ट उल्लेख अर्जात नमूद करावा. तसेच उमेदवाराने स्वत:चा लेखनीक आणल्यास तो लेखणिक आणि उमेदवार एकाच शाखेचे असतील तर तो लेखीनक उमेदवाराचे शैक्षणिक पात्रतेपेक्षा एक पायरी/टप्पा कमी असावा मात्र लेखनिक भिन्न शाखेचे असल्यास त्यास ही अट लागू राहणार नाही.

तसेच निवड झालेल्या अपंग उमेदवाराचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र वैद्यकीय मंडळाकडून प्रमाणीत करुन घेऊन त्यांचे अहवालानंतर नियुक्ती आदेश निर्गमीत करणेबाबत योग्य ती कार्यवाही अनुसरण्यात येईल.

***वेतनश्रेणी व शैक्षणिक अर्हता***

खालील पदांकरिता महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम 1967 नुसार आवश्यक असलेली खालील प्रमाणे पदनिहाय शैक्षणिक अर्हता अर्ज करतेवेळी उमेदवारांनी धारण केलेली असणे आवश्यक आहे.

**पद क्र. -1 आरोग्य सेवक (महिला) (वेतन संरचना 5200-20200 ग्रेड वेतन 2400/-)** ज्यांची अर्हताप्राप्त सहाय्यकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणुक देण्यात येईल.

**पद क्र. -2 पशुधन पर्यवेक्षक :- (वेतन संरचना 5200-20200 ग्रेड वेतन 2400/-)** जे माध्यामिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पशुसंवर्धन संचालनालयाने चालविलेल्या किंवा महाराष्ट्र राज्यातील संविधानिक कृषि विद्यापीठानी चालविलेल्या किंवा महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापीठाने चालविलेला पशुधन पर्यवेक्षक प्रशिक्षणा अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्याच्या तंत्र शिक्षण परिक्षा मंडळामार्फत किंवा महाराष्ट्र राज्यातील संविधानिक कृषि विद्द्यापीठामार्फत चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापीठाने चालविलेला दोन वर्षाचा दुग्धव्यवसाय व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण झाले असतील किंवा महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर यांच्यामार्फत चालविण्यात येणारा पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण झाले असतील किंवा वैधानिक विद्यापीठातील पशुवैद्यकीय शास्त्रातील पदवी धारण करीत असतील असा उमेदवार

.

**पद क्र.-3 स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक (वेतन संरचना 5200-20200 ग्रेड वेतन 2400/-)** किमान स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यकाचा एक वर्षे मुदतीचा पाठ्यक्रम परिक्षा उत्तीर्ण किंवा शासनाने वेळोवेळी समतुल्य घोषीत केलेली अर्हता ( आर्कीटेक्चरल ड्राफ्टस्मन, कन्स्टक्शन सुपरवायझर इत्यादी )

***2. विशेष सुचना:-*** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रशिक्षण 2000/प्र.क्र.61/2001/39 दिनांक 19 मार्च 2003 अनुषंगिक सुधारीत शासन निर्णयान्वये उपरोक्त पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणी / वापराबाबतचे नमूद केलेले प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासुन दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल.

1) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर, C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा
2) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र .

***3. वयोमर्यादा :-***

1) जाहीरातीत नमूद सर्व पदे ही अपंगाच्या अनुशेषाअंतर्गत भरावयाची असल्याने सदर पदासाठी उमेदवाराचे वय दिनांक-- **28 मार्च 2013** रोजी 18 वर्षापेक्षा कमी व 45 वर्षापेक्षा जास्त नसावे.
2) जे उमेदवार अधीपासुन जिल्हा परिषद सेवेत आहेत. त्यांच्यासाठी वयोमर्यादा सरसकट 45 वर्ष राहील.
3) सर्व पदासाठी वयोमर्यादा दिनांक **28 मार्च 2013** रोजी गणना करण्यात येईल.
4) शासन परिपत्रक दिनांक 14 मे, 1986 नुसार 6 महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी केंद्र शासनाच्या सशस्त्र सेवा दलात सेवा केलेल्या माजी सैनिकाचे बाबतीत त्यांची सैनिकी सेवा अधिक तीन वर्षे इतकी वयोमर्यादेत सूट देण्यात येईल. विकलांग माजी सैनीकाचे बाबतीत वयामर्यादेत सरसकट 45 वर्षापर्यंत सूट देण्यात येईल.

***4. परीक्षा शुल्क* :-** आरोग्य सेवक (महिला) व पशुधन पर्यवेक्षक या पदाच्या परीक्षेकरिता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.200/- व मागास प्रवर्गातील उमेदवारासाठी रु.100/- परीक्षा शुल्क असेल. तर स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाच्या परिक्षेकरीता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु. 150/- व मागास प्रवर्गातील उमेदवारासाठी रु.75/- परीक्षा शुल्क असेल. सदरील परीक्षा शुल्क मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या नांवे काढलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या डी.डी. द्वारे अर्जासोबत द्यावे लागेल. सदर परीक्षा शुल्क नापरतावा राहील कोणत्याही परिस्थितीत ते उमेदवारास परत केले जाणार नाही. **माजी सैनिकानी अर्जासोबत परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.**

**5. लेखी परीक्षेचे स्वरुप :-** अर्ज छाननीत लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या लेखी परीक्षेचे स्वरुप खालील प्रमाणे राहील. वरीलपैकी ज्या पदासाठी शैक्षणिक अर्हता पदवी आहे त्या पदासाठी पदवीच्या दर्जाच्या समान प्रश्नपत्रिका राहील. परंतु मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. ज्या पदासाठी माध्यमिक शालांत परीक्षा अशी अर्हता आहे त्या पदासाठीची प्रश्नपत्रिका ही राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील.

## तक्ता क्रमांक 1

### प्रश्न पत्रिकेचे स्वरुप

शासन परिपत्रक क्र.एपिटी 2007/प्र.क्र.303(अ)/आस्था-8, दिनांक 19 मार्च, 2008 व 6 फेब्रुवारी, 2010 सोबतचे परिशिष्ट- ब

| अ क्र | संवर्ग | मराठी संबंधित प्रश्न | | इंग्रजी संबंधित प्रश्न | | सामान्य ज्ञान संबंधित प्रश्न | | गणित संबंधित प्रश्न | | बुध्दीमापन संबंधित प्रश्न | | तांत्रिक प्रश्न संबंधित प्रश्न | | एकूण | | मुलाखती करिता ठेवलेले गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | |
| 1 | आरोग्य सेवक (महिला) | 10 | 25 | 10 | 25 | 10 | 25 | 10 | 25 | 00 | 00 | 32 | 80 | 72 | 180 | 20 |
| 2 | पशुधन पर्यवेक्षक | 10 | 25 | 10 | 25 | 10 | 25 | 00 | 00 | 10 | 25 | 32 | 80 | 72 | 180 | 20 |
| 3 | स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक | 10 | 25 | 10 | 25 | 10 | 25 | 10 | 25 | 00 | 00 | 32 | 80 | 72 | 180 | 00 |

***5. सर्व पदांकरिता सूचना :-***

जाहिरातीतील विविध पदासाठी पदनिहाय लेखी परीक्षेचा दिनांक, वेळ व अर्ज ज्या विभागाकडे सादर करावयाचा आहे त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

**तक्ता क्रमांक 2**

| अ. क्र. | पदाचे नांव | लेखी परीक्षेचा दिनांक व वेळ | संबंधित पदासाठी अर्ज सादरकरावयाच्या सदस्य सचिव यांचे पदनाम |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | आरोग्य सेवक (महिला) | दिनांक - 07.04.2013<br>सकाळी ठिक 10.00 ते 11.30 | सदस्य सचिव तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद,उस्मानाबाद |
| 2 | पशुधन पर्यवेक्षक | दिनांक - 07.04.2013<br>सकाळी ठिक 10.00 ते 11.30 | सदस्य सचिव तथा<br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी<br>जिल्हा परिषद,उस्मानाबाद |
| 3 | स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक | दिनांक - 07.04.2013<br>सकाळी ठिक 10.00 ते 11.30 | सदस्य सचिव तथा<br>कार्यकारी अभियंता (बां)<br>जिल्हा परिषद,उस्मानाबाद |

***6. माजी सैनिक उमेदवारासाठी***

1. शासन परिपत्रक क्रमांक एपिटी-1480/19667/3444/12 दिनांक 14 मे,1986 नुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये युध्द काळात व युध्द नसताना सैनिकी सेवेत मृत्यू झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नौकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटूंबातील फक्त एका व्यक्तीला माजी सैनिकानंतरच्या पसंती क्रमाने कुटूंबातील फक्त एका सभासदास उपलब्ध पदावर नियुक्ती देण्याबाबत तरतूद आहे **.**

***7. इतर अटी व शर्ती***

1) राष्ट्रीयत्व - भारतीय
2) सर्व पदासाठी उमेदवाराना मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.
3) उमेदवार हा महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) तथापि महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. मकसी-1007/प्र.क्र.36/का-36/दिनांक 10 जुलै,2008 नुसार महाराष्ट्र-कर्नाटक सिमा भागातील दावा केलेल्या 865 गावातील 15 वर्षापासून रहिवाशी असल्याचा त्यांच्या वास्तव्याचा सक्षम प्राधाका-यांचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहील.
4) मागासवर्गीय उमेदवारानी नजिकच्या कालावधीतील सक्षम अधिकारी ( उप जिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी) यांनी दिलेले जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
5) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अनियो/1005/126 सेवा-4 दिंनाक 31 ऑक्टोबर 2005 नुसार दिनांक 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नवीन परिभाषित अंशदान

निवृत्ती वेतन योजना लागू राहील मात्र सध्या अस्तित्वात असलेल्या निवृत्तीवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984 आणि सध्या अस्तित्वात असलेल्या सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

6) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केलेली असल्यास त्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

7) शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

8) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. एआरव्ही. 200/ प्र.क्र. (17/2000)/ बारा , दिनांक 28, मार्च 2005 नुसार लहान कुटूंब असल्याचे सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

9) शासन परिपत्रक दिनांक 30 जून 2006 नुसार अनुसुचित जाती व जमाती वगळता इतर प्रवर्गातील मागासवर्गीय उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन 2011-2012 चे सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील

10) पदासाठी असलेली किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व अर्ज छाननीअंती लेखी परीक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांची यादी व लेखी परीक्षेची रुपरेषा, वेळापत्रक परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल.

13) अर्जाच्या पाकीटावर ज्या पदासाठी अर्ज करावाची आहे त्या पदाचे नाव नमुद करावे.

14) विहित नमुन्यात नसलेले अर्ज, विहित शुल्काचा डिमांड ड्राफ्ट (डी.डी) नसलेले अर्ज, विहित पात्रता धारण करत नसलेल्या उमेदवाराचे अर्ज, अपूर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, फोटो नसलेला व राजपत्रित अधिकारी / विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांनी सांक्षकीत न केलेला फोटो लावलेले अर्ज, नॉन क्रिमिलेअरचे प्रमाणपत्र साक्षांकित प्रत न जोडलेले अर्ज, प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त उमेदवाराचे बाबतीत संबंधीत प्रमाणपत्र न जोडलेले अर्ज, विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज, लहान कुटुंबाचे शपथपत्र न जोडलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

15) एखाद्या उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

16) रिक्त पदांच्या संख्येत कमी जास्त बदल होण्याची शक्यता आहे त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, कोणत्याही टप्प्यावर परीक्षा स्थगीत करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे इ. बाबतचे सर्व अधिकार जिल्हा निवड समितीस / शासनास राहतील.

17) सेवायोजन कार्यालय, आदिवासी प्रकल्प, जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त होणा-या यादीतील उमेदवारांनी विहित रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट जोडून विहित दिनांकाच्या आत अर्ज सादर करणे आवश्यक राहील. तसेच जिल्हा सैनिक कार्यालयाकडून शिफारस होणा-या माजी सैनिकांनीही विहित नमुन्यात सर्व आवश्यक कागदपत्रसाह अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्ज सादर न करणा-या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

18) निवडणूका / नैर्सगिक आपत्ती किंवा इतर अपरिहार्य कारणामुळे विहित दिनांकास लेखी परीक्षा घेणे शक्य नसेल तर सोयीच्या दिवशी लेखी परीक्षा घेण्यात येईल.

19) जिल्हा परिषदेकडे ज्या स्वातंत्र्य सैनिक नामनिर्देशित पाल्य यांनी रास्त अर्ज सादर केलेले आहेत त्यांनी पुन्हा जाहिरातीनुसार विहित नमुन्यात अर्ज सादर करणे बंधनकारक आहे त्यांच्या पूर्वीच्या रास्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

20) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

21) जाहिरातीमधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहील.

22) मुलाखतीचा दिनांक आणि वेळ नंतर http://osmanabad.nic.in या संकेतस्थळावर (Website) वर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डावर आणि याच वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येईल.

23) मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी http://osmanabad.nic.in या संकेतस्थळावर (Website) वर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल.

24) मुलाखतीसाठी येतांना उमेदवाराने सर्व मुळ कागदपत्र, उमेदवाराचे ओळखपत्र आणि राजपत्रीत अधिकारी यांनी

साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रतिचे दोन संच सोबत आणावेत. मुळ कागदपत्र तपासणीत उमेदवार पात्र नसल्याचे आढळून आल्यास  उमेदवारास कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविण्यात येईल.

25) लेखी परिक्षेसाठीच्या प्रवेशपत्रावर स्वतःचा अलीकडील कालावधीचा पासपोर्ट साईजचा फोटो लावावा. फोटोवर राजपत्रीत अधिकारी अथवा विशेष कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी व शिक्का असावा. अर्धा शिक्का फोटोवर व अर्धा शिक्का प्रवेशपत्रावर असावा. तसेच अर्धी स्वाक्षरी फोटोवर व अर्धी स्वाक्षरी प्रवेशपत्रावर असावी.

26) अर्जाच्या नमुन्यावरिल फोटो आणि प्रवेशपत्रावरिल फोटो सारखाच असावा. त्यामध्ये फरक असु नये.

***8. निवड  पध्दत***

1) पद क्रमांक 1 ते 3 साठी लेखी परीक्षेसाठीचे विषय निहाय प्रश्न संख्या व त्यास ठेवलेले गुण आणि तोंडी मुलाखतीसाठी ठेवलेले गुण याचा तपशिल तक्ता क्रमांक 1 मध्ये नमुद करण्यात आल्यानुसार राहील.

2) पद क्रमांक 1 ते 3 साठी संवर्ग निहाय गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. व ज्या पदांसाठी मुलाखती विहित करण्यात आलेल्या आहेत त्या संवर्गासाठी लेखी परीक्षेनुसार मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना शासन निर्णय क्रं.प्रानिमं -2007/प्र.क्र.46/07/13-अ, दिनांक 19 ऑक्टोबर 2007 च्या परिच्छेद 7 मध्ये नमूद केलेल्या प्रमाणानुसार गुणवत्तेप्रमाणे तोंडी मुलाखतीस बोलावण्यात येईल. तथापि शासन निर्णय दिनांक 27.06.2008 मधील तरतुदीनुसार गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने  एकूण गुणापैकी किमान 45 टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

3) पदांची उपलब्ध संख्या विचारात घेता लेखी परीक्षेनुसार निकाल तयार करतांना  गुणवत्तेच्या आधारे व समान गुण धारण करणा-या त्या त्या संवर्ग / प्रवर्गाच्या उमेदवारांमध्ये गुणवत्ता क्रम निश्चित करतांना तो शासन निर्णय 27 जून,2008 मधील परिच्छेद 6 मध्ये नमूद केलेल्या निकषावर लावून उमेदवारांची यादी मर्यादित केली जाईल.

***9. अर्ज कसा करावा.***

1. प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा

2. अर्ज विहित नमुन्यातच संगणकिकृत करुनच सादर करावा. अर्जासोबत सर्व संबधित कागदपत्राच्यां छायांकित प्रति साक्षांकित करून जोडणे आवश्यक आहे.

3. उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्जावर विहित ठिकाणी राजपत्रित अधिकारी/विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांनी सांक्षकीत केलेला स्वतःचा नजिकच्या काळातील ओळखपत्राच्या आकाराचा फोटो लावावा..

4. उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्जा सोबत स्वतःचा संपूर्ण पत्ता लिहिलेला व त्यावर रुपये 5/- ( अक्षरी रुपये पाच फक्त) चे पोष्टाचे तिकीट लावलेला 3 **X** 8 चा लिफाफा जोडावा. सदरचा लिफाफा न जोडल्यास संबंधीत उमेदवारांस लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही.

4. **अर्जा सोबत खालील प्रमाणपत्राच्या छायांकीत प्रती (लागु असलेली ) जोडाव्यात.**

1) शैक्षणिक अर्हता. 2) वयाचा दाखला / जन्म तारखेचा पुरावा. 3) टंकलेखन , लघुलेखन, संगणक अर्हता, 4) जातीचे प्रमाणपत्र / जात वैधता प्रमाणपत्र. 5) अनुभवाचे प्रमाणपत्र. 6) रहिवाशी प्रमाणपत्र. 7) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र. 8) अपंगाचे, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन पदविधर कर्मचारी, स्वातंत्र्य सैनिक पाल्य, माजी सैनिक प्रमाणपत्र. 9) गुणवत्ताधारक खेळाडू असल्याचे प्रमाणपत्र. 10) परिक्षा शुल्कचा राष्ट्रीयकृत बैंकेचा डिमांड ड्राफ्ट

**5. उमेदवारांनी अर्जा सोबत मुळ प्रमाणपत्र जोडू नयेत.**

| | | |
|---|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **सदस्य सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |
| जिल्हा निवड समिती तथा | निवड समिती तथा | जिल्हा निवड समिती तथा |
| उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) | मुख्य कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी उस्मानाबाद |
| जिल्हा परिषद,उस्मानाबाद | जिल्हा परिषद,उस्मानाबाद | |

# जिल्हा परिषद उस्मानाबाद अपंग अनुशेष भरती सन 2013

## अर्जाचा नमुना

उमेदवाराचा अलीकडच्या काळातील राजपत्रित अधिकारी/विशेष कार्यकारी अधिकारी यांनी सांक्षकीत केलेला केलेल्या ओळखपत्राच्या आकाराचा फोटो चिकटावा (स्टेपल किंवा पिन लावू नये.

**अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक :-** [ ]

**प्रति,**

**सदस्य सचिव तथा**

---------------------------

जिल्हा परिषद,उस्मानाबाद

**पदाचे नांव** :- ------------------------------------- पदासाठी अर्ज

1. अर्जदाराचे संपुर्ण नांव ( मराठीमध्ये ) : - स्वतःचे नांव ---------------------------------------------------

   वडीलाचे / पतीचे नांव ------------------------------------------

   आडनांव--------------------------------------------------------

2. पत्रव्यवहाराचा पुर्ण पत्ता : - --------------------------------------------------------------------------

   घर क्रमांक --------------- गांव / शहर ---------------------------- पोष्ट----------------------

   तालुका -------------------- जिल्हा --------------------- पिन कोड क्रमांक ------------------

   दूरध्वनी क्रमांक --------------------------- / मोबाईल क्रमांक.---------------------------------

3. जन्म दिनांक [ ][ ] दिनांक [ ][ ] महिना [ ][ ][ ][ ] वर्षे.

4. जन्म दिनांक अक्षरात -------------------------------------------------------------------------------------

5. दिनांक -------------- रोजीचे वय. दिवस [ ] महिने [ ] वर्षे [ ]

6. राष्ट्रीयत्व :- -----------------------

7. उमेदवार पुरुष अथवा स्त्री. :- -----------------------

8. उमेदवार विवाहित आहे की अविवाहित :- ------------------------

9. अर्जदाराची जात :- ------------------------

10. जातीचा प्रवर्ग :- खालील चौकोनात पुढील पैकी एकाच ठिकाणी ✓ अशी खुण करावी. ( मागासवर्गीय उमेदवाराला मेरीट नुसार खुल्या प्रवर्गात पात्र ठरविता येते, त्यामुळे मागासवर्गीय उमेदवारांनी त्यांचा प्रवर्गच नमूद करावा.)

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

11. समांतर आरक्षणाचा प्रकार :- योग्य रकान्यात ✓ अशी खुण करा. एका पेक्षा अधिक ठिकाणी पात्रतेनुसार ✓ अशी खुण करता येईल.

| महिला | माजी सैनिक | अपंग | अंशकालीन उमेदवार | प्रकल्पग्रस्त | खेळाडू | भूकंपग्रस्त |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

टिप :- 1) माजी सैनिक म्हणजे स्वतः उमेदवार माजी सैनिक असावा, किवा युध्द काळात व युध्द नसताना सैनिकी सेवेत मृत्यू झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नौकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटूंबातील सदस्य असावा. याशिवाय माजी सैनिकाच्या इतर नातेवाईकांना माजी सैनिक आरक्षणाचा लाभ मिळणार नाही.

12.अपगत्वाचा प्रकार (अल्पदृष्टी /अस्थिव्यंग/कर्णबधीर) [ ] टक्केवारी [ ]

13. उमेदवार अधिपासुन जिल्हा परिषद सेवेत आहेत काय ? :- होय [ ] नाही [ ]

14. अ) जातीचे प्रमाणपत्र देणा-या अधिका-याचा हुद्दा, प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक

----------------------------------------------------------------------------------------------------------------

ब) उन्नत आणि प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र देणा-या अधिका-याचा हुद्दा, प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक ( अनु.जाती/ जमाती वगळून) (समांतर महिला)

----------------------------------------------------------------------------------------------------------------

15. अ) अर्जदाराची शैक्षणिक पात्रता :-

| अ. क्र. | शिक्षण | संस्थेचे नांव /बोर्ड / विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | |
| 2 | | | | | | |
| 3 | | | | | | |

16. ब) टंकलेखन व संगणक अर्हता तपशिल व इतर गुणवत्ता

| अ.क्र. | टंकलेखन विषय (भाषा) | श.प्र.मि. | उतीर्ण वर्षे | संस्थेचे नांव | संगणकीय अर्हता | उतीर्ण वर्षे |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | |
| 2 | | | | | | |

17. अनुभव असल्यास

| अ.क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नांव | पद | कालावधी | | वर्ष महिने | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासुन | पर्यंत | | |
| 1 | | | | | | |
| 2 | | | | | | |

18. सेवा योजन कार्यालय नोंदणी क्रमांक व दिनांक ( जिल्ह्यासह) :- नोंदणी क्र. -------------- दिनांक ------------- जिल्हा --------

19. महाराष्ट्राचा मूळ रहिवाशी आहे काय ? :- होय [ ] नाही [ ]

20. महाराष्ट्र - कर्नाटक सीमावर्ती भागातील 865 गावातील रहिवाशी आहे काय ? होय किंवा नाही :- ----------------------
( असल्यास 15 वर्षाचे वास्तव्याचा सक्षम अधिका-याचा विहित नमुन्यातील दाखला जोडावा)

21. अर्जदार स्वातंत्र्य सैनिकाचा पाल्य आहे काय ? होय किंवा नाही (नामनिर्देशन पत्राची साक्षांकित प्रत जोडावी) :- ------------------

22. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे काय ? होय किंवा नाही :- ------------------

23. डी.डी. बाबत तपशिल रूपये -------/- डीडी क्रमांक------------- दिनांक ----/----/2011 बैंकेचे नांव --------- ब्रांच कोड------

24. उमेदवाराचा ई मेल आय डी -----------------

मी याद्वारे, प्रमाणित करतो /करते की, माझ्या माहितीनुसार वरील तपशिल सत्य आणि अचूक आहे. या माहितीतील कोणताही तपशिल चुकीचा /खोटा आढळल्यास माझा अर्ज रद्द करण्यात येईल व माझेवर कायदेशिर कारवाई करण्यात येईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

उमेदवाराची सही

तारीख :

उमेदवाराचे नाव ------------------------

महाराष्ट्र नागरीसेवा (लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र ) नियम 2005 मधील प्रतिज्ञापनाचा नमुना

## प्रतिज्ञापन

**नमुना - अ**

मी, श्री /श्रीमती/कुमारी ------------------------------------------------- श्री ----------------------------------- - यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय ----------- वर्षे, राहणार--------------------------------याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो की / करते की,

1. मी-------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज सादर केलेला आहे.
2. आज रोजी मला ------------------------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत त्यापैकी दिनांक 28 मार्च,2005 या नंतर जन्माला आलेली मुलांची संख्या --------------- आहेत. ( असल्यास जन्म दिनांक नमूद करावा)
3. हयात असेलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2005 व तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

दिनांक :

ठिकाण : उमेदवाराची सही.

उमेदवाराचे नाव ------------------------

# अपंग अनुशेष भरती

## जाहिरात क्रमांक 01/2013

## जिल्हा निवड समिती उस्मानाबाद

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ मुंबई यांचेकडील दाखल जनहित याचिका क्रमांक 3294/2010 प्रकणात अपंगाचा अनुशेष विशेष मोहिमेद्वारे भरणेबाबत निर्देश दिलेले असलेने विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांचे अ.शा.पत्र क्र. 2011/विशा/जिप/आस्था-1/सीआर-87/कावि दिनांक 19.10.2011 तसेच दि.3.3.2013 रोजी मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे अध्यक्षतेखालील आयोजित व्हिडीओ कॉन्फरन्स बैठकीतील सुचना नुसार अपंग अनुशेषांतर्गत सरळसेवेची खालील रिक्त पदे भरणेबाबत दिलेल्या निर्देशाप्रमाणे जिल्हा परिषद उस्मानाबाद व त्यांच्या अधिपत्याखालील विभागाच्या आस्थापनेवरील खालील नमूद गट क या संवर्गातील अपंगाच्या अनुशेषाची पदे भरण्याचे अनुषंगाने निवड यादी तयार कर्ण्यासाठी शैक्षणिक अर्हतेनुसार पात्र उमेदवारांकडून स्पर्धा परीक्षेसाठी (लेखी / मौखीक ) शासन परिपत्रक क्रमांक एपिटी- 2009/ प्र.क्र. 352/आस्थापना-8 दिनांक 17 डिसेंबर, 2009 मधील तरतुदीनुसार **दिनांक 28 मार्च 2013** पर्यंत (सुटीचे दिवस वगळून) अर्ज मागविण्यात येत आहेत सदर जाहिरात अर्जाच्या नमुन्यासह http://osmanabad.nic.in या संकेतस्थळावर (Website) वर उपलब्ध आहे.

**अपंगाच्या अनुशेषांतर्गत भरावयाच्या रिक्त पदांचे आरक्षण ( समांतर आरक्षणासह)**

| अ.क्र. | पदनाम | एकूण भरावयाची पदे | अपंगत्वाचा प्रकार |
|---|---|---|---|
| 1 | आरोग्य सेवक (महिला) | 5 | चलनवलन विषयक विकलांगता [अस्थिव्यंग (OL)] |
| 2 | पशुधन पर्यवेक्षक | 2 | श्रवण शक्तीतील दोष [कर्णबधीर (HH)] |
| 3 | स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक | 1 | चलनवलन विषयक विकलांगता/ श्रवण शक्तीतील दोष [अस्थिव्यंग- OL,OA कर्णबधीर-HH)] |
| | **एकुण** | **8 पदे** | |

वरील विविध संवर्गातील अपंगाच्या अनुशेषाअंतर्गत भरावयाच्या पदाबाबत सविस्तर जाहिरात मा.जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांचे कार्यालयाच्या **http://osmanabad.nic.in** या संकेतस्थळावर तसेच मा.जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद उस्मानाबाद कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीमध्ये वर नमूद पदासाठी शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, वेतनश्रेणी, परिक्षेचे स्वरुप, परिक्षेचे शुल्क, व इतर नियम व अटी नमूद केलेल्या आहेत. सदरील जाहिरातीत नमूद नियम व अटीनुसार उमेदवाराने जाहिरातीमधील विहित नमुन्यातच दिनांक **28 मार्च 2013** पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) आपले अर्ज सादर करावेत. जाहिरातीत नमूद केलेल्या नियम व अटीनुसारच अर्ज स्विकारले जातील.

**स्वाक्षरीत/-**
सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद,उस्मानाबाद

**स्वाक्षरीत/-**
सदस्य
निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,उस्मानाबाद

**स्वाक्षरीत/-**
अध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी उस्मानाबाद